# प्रकरण तिसरे

## संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाची जैन्याळ गावातील अंमलबजावणी

# प्रकरण तिसरे

# 'संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाची जैन्याळ गावातील अंमलबजावणी'

(Implementation of Sant Gadgebaba Gram Swachhata Abhiyan in Jainyal Village)

## अ) जैन्याळ गावाचा अल्प परिचय :

जैन्याळ हे गाव कोल्हापूरपासून ४८ कि. मी. अंतरावर आहे. ते डोंगराच्या कुशीत वसलेले १६३२ लोकवस्तीचे आणि २८६ कुटुंबांचे गाव आहे. ते कोल्हापूर जिल्ह्यातील, कागल तालुक्यातील गाव आहे. एकेकाळी व्यसनाधीन व अंधश्रद्धेला चिकटून असणारे तसेच गलिच्छ असणारे असे हे गाव होते. येथील लोकांची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट अशी असून लोक प्रेमळ कष्टाळू आहेत.

जैन्याळ गावाविषयीची महत्त्वपूर्ण सांख्यिकी स्वरूपाची माहिती खालील तक्त्यात दिली आहे.

■ **जैन्याळ गावाची सर्वसाधारण माहिती :**

| अ.क्र. | बाब | माहिती |
|---|---|---|
| १) | गावाचे नाव | जैन्याळ |
| २) | तालुक्याचे नाव | कागल |
| ३) | जिल्ह्याचे नाव | कोल्हापूर |
| ४) | गावाची एकूण लोकसंख्या | १६३२ |
| ५) | गावातील एकूण महिलांची संख्या | ८२५ |
| ६) | गावातील एकूण पुरूषांची संख्या | ८०७ |
| ७) | एकूण कुटुंबाची संख्या | २८६ |
| ८) | दारिद्रय रेषेवरील कुटुंबाची संख्या | २६८ |

| | | |
|---|---|---|
| ९) | दारिद्रय रेषेखालील कुटुंबाची संख्या | ०१८ |
| १०) | भौगोलिक क्षेत्र | ५०६ हेक्टर |
| ११) | बागायत क्षेत्र | १८ एक्कर |
| १२) | जिरायत क्षेत्र | ३७४ हेक्टर |
| १३) | गावठान क्षेत्र | ३.२० हेक्टर |
| १४) | गायरान क्षेत्र | १.३५ हेक्टर |
| १५) | रस्ते मार्ग | ६.१३ हेक्टर |
| १६) | पोटखराब | ७.६६ हेक्टर |
| १७) | सांडपाण्यावरील शेतीचे क्षेत्र | ०.४० हेक्टर |
| १८) | गावाचा एकूण आकार | १६७९.४८ |
| १९) | मुख्य पिके | तंबाखु, सोयाबीन, भुईमुग |
| २०) | गावातील गुरांची संख्या (गाय व म्हैस) | ४०८ |
| २१) | शेतीसाठी पाणी पुरवठ्याची साधने | नदी, विहिरी, बोअर |
| २२) | पिण्याच्या पाण्यासाठी नळ कोंडाळे संख्या | ३ |
| २३) | कुपनलिकांची साधने | बोअर |
| २४) | बांधलेली घरे | - |
| | इंदिरा आवास योजना | १० |
| | समाजकल्याण योजना | ०१ |
| २५) | खाजगी दवाखाने | १ |
| २६) | अंगणवाडी संख्या | १ |
| २७) | गावातील एकूण बायोगॅस प्लॅंट | ६१ |
| २८) | गावातील रेशन धान्य दुकानांची संख्या | २ |
| २९) | सहकारी दुध सोसायटी संख्या | २ |

| | | |
|---|---|---|
| ३०) | गावातील पतसंस्थांची संख्या | २ |
| ३१) | ग्रामीण कुटुंब उपकेंद्राची संख्या | १ |
| ३२) | गावातील तरूण मंडळांची संख्या | ११ |
| ३३) | गावातील महिला मंडळांची संख्या | १ |
| ३४) | महिला बचत गटांची संख्या | २४ |
| ३५) | शासकीय इमारतींची संख्या | ५ |
| ३६) | गावातील एकूण देवालय इमारत संख्या | ६ |
| ३७) | प्राथमिक शाळा | १ |
| | मुलांची संख्या | ९९ |
| | मुलींची संख्या | १२५ |
| | एकूण विद्यार्थ्यांची संख्या | २२४ |
| ३८) | एकूण शौचालयाची संख्या | २८६ |
| | वैयक्तिक शौचालय | २६६ |
| | अभियानापूर्वी बांधलेली शौचालय | ७२ |
| | अभियानानंतर बांधलेली शौचालय | २१४ |
| | सार्वजनिक शौचालय | २० |
| ३९) | गावातील ग्रंथालय संख्या | १ |
| ४०) | भजनी मंडळ संख्या | २ |
| ४१) | निर्धुर चुलींची संख्या | २२५ |
| ४२) | गॅस सिलेंडर | २४ |
| ४३) | कुटुंब नियोजन झालेली कुटुंबे | १९८ |
| ४४) | चालुवर्षातील पाणीपट्टी दर | १०० |
| ४५) | दरमहा पाणी शुध्दीकरण खर्च | २४६ |

| | | |
|---|---|---|
| ४६) | दरमहा विजेचे बील | ५०० |
| ४७) | गावातील किती अतिक्रमणे हटविली | ३२ |
| ४८) | एका अपत्यानंतर शस्त्रक्रिया केलेली दांपत्ये | ३ |
| ४९) | गावातील किती घरे गटारास जोडलेली आहेत | ७४ |
| ५०) | ग्रामपंचायत कराची एकूण मागणी | १ लाख ४ हजार |
| ५१) | गावात सार्वजनिक कचरा कोंडाळे | १० |
| ५२) | महात्मा फुले जलभूमी अभियानातून केलेले काम | वनराई बंधारे |
| ५३) | यशवंत ग्रामसमृध्दी योजनेतून केलेले काम | बंदिस्त गटारे |
| ५४) | अभियान राबविण्यासाठी एकंदर खर्च | ८४ लाख |
| ५५) | अपारंपारिक ऊर्जास्त्रोत | सौरलॅम्प, गोबर गॅस, निर्धुर चुल, सोलर कुकर, सोलर कंदील |
| ५६) | अभियानकाळात गावात किती झाडे लावली | २०,००० |
| ५७) | लोकसंख्या वाढीचे वार्षिक प्रमाण | दर हजारी १.२ |

संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान गावात सन २००२ सालापासून सुरू झाले. त्यापूर्वी, एस.टी. च्या प्रवासात मैल्याची दुर्गंधी आली की, गाव आल्याचा पत्ता लागायचा. प्रवासी नाकाला रुमाल लावायचे. पण आता स्थिती पालटतीय युद्ध पातळीवर या गावाने स्वत:ची वैशिष्ट्ये जपत कायापालट केला आहे. स्पर्धेपेक्षाही गावासाठी हे सूत्र ठेऊन जैन्याळकरांनी कामाला सुरूवात केली. ज्या गावचा लौकिक व्यसन, मारामाऱ्या, संघर्ष, कोर्टकचेऱ्या यासाठी होता, ते गाव इतक बदलू शकतं हेच आश्चर्यजनक आहे. पण या ग्रामस्थांनी ठरवलं की, बदलायचं. आपल्या गावातील सारे कलंक पुसून टाकायचे. तसेच ग्रामस्थांनी आपल्या संसारातील पै-पै वाचवून गावाच्या विकासासाठी अर्पण केले. गाव राजकारणी असल्यामुळे दोन विरोधी गट होते. पण काही काळातच ते एक झाले व

जैन्याळच्या वाटचालीत सारेच ग्रामस्थ, साऱ्याच संस्था सहभागी झाल्या.

सन २००२ सालापासून जैन्याळ गावाला सातत्याने मिळालेली बक्षिसे पाहता त्यांच्या कामाचा अंदाज लक्षात येतो. या गावाला सन २००२-०३ मध्ये तालुक्यात प्रथम क्रमांक व जिल्ह्यात दुसरा क्रमांक (विभागून) मिळाला. त्यामुळे तालुक्यातून रु. २५,०००/- तर जिल्ह्यातून रु. १,५०,०००/- बक्षिस यांना मिळाले. सन २००३-०४ मध्ये तालुक्यात प्रथम, जिल्ह्यात प्रथम व पुणे विभागात प्रथम क्रमांक पटकावून जैन्याळ गावाने मोठीच झेप घेतलेली आहे. त्यामुळे सन २००३ मध्ये तालुका स्तरावर प्रथम क्रमांक मिळाला व १,५०,०००/- चे बक्षिस व प्रमाणपत्र मिळाले. जिल्हा स्तरावर प्रथम क्रमांक मिळाला व ५,५०,०००/- चे बक्षिस व प्रमाणपत्र मिळाले. विभाग स्तरावर प्रथम क्रमांक मिळाला व १०,००,००० रु. चे बक्षिस व पारितोषिक मिळाले. या यशामुळे गाव राज्यस्तरावर उतरले. सन २००४ मध्ये राज्यस्तरीय विभागून तिसरा क्रमांक मिळाला असून ६,२५,०००/- रु. चे बक्षिस व पारितोषिक मिळाले आहे. सन २००५ मध्ये 'निर्मलग्राम' हा पुरस्कार व २,००,०००/- चे बक्षिस व पारितोषिक मिळाले आहे.

तसेच सन २००५ मध्ये महाराष्ट्र शासनाने सुरू केलेला यशवंत ग्राम पुरस्कार जैन्याळला मिळाला आहे. तसेच गावाचे ग्रामसेवक श्री. आर. वाय. नुल्ले यांना आदर्श ग्रामसेवक हा पुरस्कार मिळाला. गावचे माजी सरपंच श्री. परशुराम शिंदे व ग्रामसेवक श्री. आर. वाय. नुल्ले यांना चिकोत्रा भुषण हा पुरस्कार मिळाला आहे. सध्याचे जैन्याळ गावचे सरपंच श्री. पांडुरंग गुरव व ग्रामसेवक श्री. आर. वाय. नुल्ले यांना हेमगौरव पुरस्कार मिळाला. तसेच गावाला 'आदर्श गाव' हा पुरस्कार मिळाला आहे.

आत्ता, एस.टी.तून उतरताच जैन्याळ गावाची आकर्षक स्वागत कमान दिसते. तेथे येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना स्वागत कमानीच्या शेजारी विसाव्यासाठी पर्णकुटी आहे. जवळच पाणी भरून दोन माठ, ग्लास, वगराळ ठेवलेले आहे. कोणालाही घोटभर पाणी

पिऊन तहान भागवून विसावा करता यावा हा या मागचा गावकऱ्यांचा हेतू आहे. सर्वत्र स्वागत कमानीतून आत शिरताच रस्त्याच्या दुतर्फा दुरांडा, केळी, बदाम, अशोक, नारळाच्या झाडांची हिरवळ व स्वच्छ सुंदर रस्ते आहेत. संत तुकडोजी चौकात नवीन स्टेज बांधकाम केले असून दोन्ही झाडांना पारकट्टे तयार करून भव्य असा परिसर तयार करून घेतला आहे. त्यामुळे गावात चाललो आहोत का बागेत हे क्षणभर कळत नाही. अभियानापूर्वी एकही कचराकुंडी नव्हती. आता प्रत्येक गल्लीत एक याप्रमाणे कचराकुंडी ठेवली आहे. तसेच प्रमुख चौकात ओला व सुका कचरा, काच, प्लॅस्टिक, धातू इ. साठी दोन स्वतंत्र ठिकाणी कचरा कुंड्या बांधण्यात आल्या आहेत. प्रत्येक गल्लीत दररोज निघणारा कचरा प्रत्येक भागातील मंडळाची मुले त्यांच्या घंटागाडीतून कचराकुंड्यात नेऊन टाकतात. गावात एक गांडूळखत प्रकल्प तयार केला. या पासून ग्रामपंचायतीला आर्थिक उत्पन्नही मिळाले आहे. प्रत्यक्ष भेटीच्या वेळी हा गांडूळ खत प्रकल्प बंद असल्याचे दिसून आले. पण हा प्रकल्प पुन्हा सुरू करणार असल्याचेही समजले. दुसरा नॅडेप खत प्रकल्प होता. नॅडेप प्रकल्पात कचरा टाकून त्यापासून ही शास्त्रीय पद्धतीने खत तयार केले जाते.

**ब) संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धा सन २००२-०३ या अंतर्गत जैन्याळ गावात राबविलेल्या उपक्रमांची यादी :**

जैन्याळ गावात २००२-०३ मध्ये संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाची नेमकी कशी अंमलबजावणी झाली याविषयीच्या तपशीलवार नोंदी असलेला ग्रामपंचायत कार्यातील अहवाल ग्रामसेवकांकडून मिळविण्यात आली. या अहवालाखालील माहितीचा वापर करून हा विभाग लिहिण्यात आला आहे.

| अ.नं. | उपक्रम | दिनांक | वार |
|---|---|---|---|
| १ | ग्रामसभेचे आयोजन | २ ऑक्टो. ०३ | शनिवार |
| २ | ग्रामसफाई व कचरामुक्ती जागृती मोहिम | ३ व ४ ऑक्टो. ०३ | रवि., सोम. |
| ३ | शोषखड्ड्यांची स्वच्छता/बांधकाम जागृती मोहिम | ५ व ६ ऑक्टो. ०३ | मंगळ, बुध. |
| ४ | शाळा व सार्वजनिक इमारती स्वच्छता जागृती मोहिम | ७ व ८ ऑक्टो. ०३ | गुरू., शुक्र. |
| ५ | घर व परिसर स्वच्छता व सजावट मोहिम | ९ व १० ऑक्टो. ०३ | शनि., रवि. |
| ६ | स्वच्छताविषयक साहित्याचे प्रदर्शन व प्रात्यक्षिके व प्रचार प्रसिद्धी याबाबतच्या तांत्रिक ज्ञानाबाबतची प्रात्य. | ११ व १२ ऑक्टो. ०३ | सोम., मंगळ. |
| ७ | शौचालय दुरूस्ती/बांधकाम अभियान मोहिम | १३ व १४ ऑक्टो. ०३ | बुध., गुरू. |
| ८ | पाणी शुद्धता प्रात्यक्षिक व प्रशिक्षण मोहिम | १५ व १६ ऑक्टो. ०३ | शुक्र., शनि. |
| ९ | वैयक्तिक स्वच्छता जागृती मोहिम | १७ व १८ ऑक्टो. ०३ | रवि., सोम. |
| १० | रस्ते दुरूस्ती, सफाई व श्रमदान मोहिम | १९ व २० ऑक्टो. ०३ | मंगळ, बुध. |
| ११ | जनावरे स्वच्छता मोहिम, आदर्श गोठा व स्वच्छ जनावर | २१ व २२ ऑक्टो. ०३ | गुरु., शुक्र. |
| १२ | वृक्षसंवर्धन, परसबाग, अपारंपारिक ऊर्जा संरक्षण मोहिम | २३ व २४ ऑक्टो. ०३ | शनि., रवि. |
| १३ | गावात स्लोगन (घोषवाक्य) स्पर्धा, व्यसनमुक्ती मोहिम | २५ व २६ ऑक्टो. ०३ | सोम., मंगळ. |
| १४ | सदृढ बालक स्पर्धा, माता बालसंगोपन, रोगनिदान व प्रतिबंध मोहिम | २७ व २८ ऑक्टो. ०३ | बुध., गुरू. |
| १५ | गटारे, सांडपाणी निर्मुलन, सांडपाणी पुर्नःवापर मोहिम | २९ व ३० ऑक्टो. ०३ | शुक्र., शनि. |
| १६ | संकल्प दिवस | ३१ ऑक्टो. ०३ | रवि. |

वरील कार्यक्रम गावात कोणत्या रीतीने राबविले गेले याचे विवेचन खाली करण्यात आले आहे.

**१) दि. २ ऑक्टोबर ०३ (शनिवार) 'ग्रामसभेचे आयोजन'**

दि. २ ऑक्टोबर ०३ रोजी संस्कार वाहिनीद्वारे ग्रामस्थांना ग्रामपंचायतीसमोर ग्रामसभेला एकत्र बोलाविले. संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानातील १६ उपक्रम राबविण्याचे ठरविण्यात आले. त्या सर्व उपक्रमांचे योग्य ते नियोजन करण्यासाठी गावचे ग्रामसेवक गावचे विद्यमान सरपंच, माजी सरपंच यांनी ग्रामस्थांची ग्रामसभा घेतली. या सभेला एकूण १५४ ग्रामस्थ हजर होते. सदर ग्रामसभेमध्ये दि. ०२ ऑक्टोबर ०३ पासून ते ३१ ऑक्टोबर ०३ पर्यंतच्या सर्व कार्यक्रमांची रूपरेषा ठरविण्यात आली. या सभेत महिला मंडळ स्थापना, संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान कमिटीची स्थापना, तरुण मंडळ स्थापना, कमिटीचे अध्यक्षांची स्थापना करण्यात आली.

सभेस हजर असलेल्या लोकांनीच संपूर्ण गाव स्वच्छ करून दाखवायचा असे ग्रामसेवकांनी आवाहन केले. ग्रामसभेत हजर असलेल्या ग्रामस्थांनी गाव स्वच्छ करण्याचे आश्वासन ग्रामसेवकांना दिले व त्याप्रमाणे प्रयत्नही सुरू केले.

**२) दि. ३ व ४ ऑक्टोंबर ०३ (रविवार, सोमवार) 'ग्रामसफाई व कचरामुक्ती जागृती मोहिम'**

अभियान राबविण्यापूर्वी जैन्याळ गाव खूपच अस्वच्छ होता. जैन्याळ गाव आला हे फक्त गावातल्या दुर्गंधीमुळे कळत होते. जैन्याळ गावातून बसमधून जाणारे प्रवासी नाकाला रुमाल लावून जात असायचे. गावात सर्वत्र घाणीने साम्राज्य केले होते. या घाणीमध्ये रस्ता सुद्धा साडपत नव्हता इतकी घाण गावात पसरली होती.

अभियानकाळात दि. ३ ऑक्टोंबर ०३ रोजी संस्कार वाहिनीद्वारे ग्रामस्थांना ग्रामपंचायतीसमोर बोलविण्यात आले. सकाळी ८ वाजता गावातून प्रभातफेरी काढण्यात

आली. गावातील अबालवृद्ध, शिक्षक, विद्यार्थी, ११ तरुण मंडळे, एक महिला मंडळ, २४ बचत गटाच्या महिला या सर्वांनी अभियानाचा ध्यास घेतला. कामाला सुरूवात केली. यामध्ये ग्रामपंचायत आवार, बेघर, वसाहत, माळवाडी वसाहत, मागासवर्ग वसाहत इ. ठिकाणचे रस्ते व परिसर सर्वांनी मिळून श्रमदानातून स्वच्छ केले.

दि. ३ व ४ ऑक्टोंबर ०३ या दोन दिवसात सदर कामासाठी गावातील एकूण २८५ इतके लोक हजर होते. तरुण मंडळांनी आणि ग्रामस्थांनी रस्ता व परिसर स्वच्छ केलेला कचरा घंटागाडीने वेगवेगळा करून कचरा पेटीत टाकला व ओला कचरा गांडूळ खताकरिता दिला. दोन दिवस केलेल्या कामाप्रमाणेच काम दररोज करायचे असे सर्वांनी ठरविले. तसेच दुसऱ्या दिवशी शोषखड्डे व स्वच्छता बांधकाम करण्यासाठी सर्वांनी हजर राहण्याचे ठरविले.

**३) दि. ५ व ६ ऑक्टों ०३ (मंगळ व बुध) 'शोषखड्ड्यांची स्वच्छता / बांधकाम जागृती मोहिम'**

अभियान राबविण्यापूर्वी गावात शोषखड्ड्यांचे बांधकाम नसल्यामुळे अनेक कुटुंबांचे सांडपाणी रस्त्यावरून वाहत होते. तसेच गटारे लहान असल्यामुळे व ती तुडूंब भरलेली असल्यामुळे डासांचे प्रमाण अधिक होते. यामुळे मलेरिया, हिवताप यासारख्या साथीच्या रोगांचा प्रसार अधिक होण्यास अनुकूल परिस्थिती अस्तित्वात होती.

अभियानाच्या अंमलबजावणीच्या काळात गावातील सांडपाण्याची विल्हेवाट लावण्यासाठी दि. ०५ ऑक्टो. रोजी ग्रामस्थ ८ वाजता ग्रामपंचायतीसमोर जमा झाले. आवश्यकतेप्रमाणे सर्व कुटुंबांनी आपापला शोषखड्डा काढण्याचे ठरविले. ज्या कुटुंबांचे सांडपाणी गटारीला जात नाही अशी गावातील एकूण ४० ते ४५ कुटुंबे होती. शोषखड्ड्याचे बांधकाम करण्याचे ठरवून कामाला सुरवात केली. सदर शोषखड्ड्यांचे तंत्रज्ञान हे ग्रामसेवक व कृषिसहाय्यक यांनी सर्वांना दिले. तरुणांच्या सहभागातून शोषखड्ड्यांचे काम सुरू केले.

गावातील रस्त्यावर वाहणारे सांडपाणी शोषखड्ड्यात गाडून प्रदूषणाचा प्रश्न मार्गी लावून आरोग्यदायी जीवन जगण्याचा संदेश लोकांना दिला.

अभियान पूर्व काळात गावातील सांडपाणी काही ठिकाणी रस्त्यावर तर काही ठिकाणी घराभोवती गटारे संपूर्ण भरून वाहत असायची. पण आज यामध्ये आमुलाग्र बदल झालेला दिसून येतो. यामध्ये सांडपाणी कोठेही गटर्समध्ये साठून राहत नाही. तसेच रस्त्यावर कोठे पाणी साठून राहत नाही. गावात एकूण ४२ शोषखड्डे बांधले आहेत. तसेच सांडपाण्यावर १४६ परसबागा तयार केल्या आहेत.

**४) दि. ७ व ८ ऑक्टो. ०३ (गुरू व शुक्र) 'शाळा व सार्वजनिक इमारती स्वच्छता जागृती मोहिम'**

अभियानपूर्व काळात जैन्याळ गावात शाळा, ग्रामपंचायत, मंदिर व परिसर तेवढासा स्वच्छ नव्हता असे समजले. सार्वजनिक इमारतींच्या स्वच्छतेकडे कोणीही जाणीवपूर्वक लक्ष देत नव्हते. गावात १ ते ४ पर्यंत शाळा होती. पुढच्या शिक्षणासाठी ५ कि. मी. अंतर कापून कापशीला पायी शिक्षणासाठी जायला लागायचे. तसेच गावातील शाळेला रंग दिलेला नव्हता. मुलांना वर्गात खाली बसावे लागत होते. तसेच शाळेतील फळे देखील खराब झालेले होते. शाळेत जाणाऱ्या मुलांच्या गळतीचे प्रमाण अधिक होते. मुलांना पिण्यासाठी स्वच्छ पाणी नव्हते. मुलांना खेळण्यासाठी व्यवस्थित पटांगण नव्हते. ग्रामपंचायत इमारत बाहेर लावलेल्या बोर्डवरून ओळखली जात होती. पंचायतीत स्वच्छता ही कधीतरी दिसायची. गावातील देवायलांची सुद्धा अशीच अवस्था होती. यात्रेच्या वेळी वर्षातून एकदा देवालये स्वच्छ केली जात होती. देवालयांच्या भिंती खचल्या होत्या. अशी जैन्याळ गावातील सार्वजनिक इमारतींची पूर्वीची स्थिती होती.

अभियान काळात ७ ऑक्टो. ०३ या दिवशी, ग्रामस्थ सकाळी ९ वाजता शाळेत गोळा झाले. त्यांनी काही महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. त्यानुसार शाळेकरिता एक खोली

बांधकाम, शाळेमध्ये बोलके फळे तयार करणे इ. कामे करण्याचे ठरले. मराठी शाळेतील मुले, शिक्षक, ग्रामस्थ, तरुण मंडळे, महिला मंडळ, बचत गटातील या सर्वांनी मिळून मराठी शाळेचा परिसर व आवार स्वच्छ केला. परिसर स्वच्छ करून जमा झालेला कचरा कंपोस्ट खतासाठी ट्रॅक्टरने नेऊन खड्ड्यात टाकला. गावात १ ते ४ थी पर्यंत शाळा असून ५ ते ७ वी पर्यंतची शाळा सुरू करण्याचा विचार झाला. यावेळी मात्र पदवीधर शिक्षकाची गरज होती. त्यावेळी शास्त्र शाखेची पदवी घेतलेला दिगंबर शेळके नावाचा तरुण सेवाभावी वृत्तीने पुढे आला. त्याने पदवीधर शिक्षक येईपर्यंत विद्यार्थ्यांना बिनपगारी शिकवले. त्याच दरम्यान निरंतर शिक्षण केंद्र सुरू झाले. दिगंबर शेळकेप्रमाणे या गावातील एम. ए. बी. एड्. झालेला दुसरा एक तरुण एम.एस. कांबळे पुढे आला. त्याने निरक्षरांना साक्षर करण्याची जबाबदारी घेतली. दिगंबर शेळके व एम. एस. कांबळे यांनी ही सेवा देऊन गावातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यामध्ये मोलाचे सहकार्य दिले आहे.

तसेच गावातील सर्व देवालयांचा व ग्रामपंचायतीचा परिसर स्वच्छ केला. शाळेकरिता बोलके फळे, बाग पिण्याच्या पाण्याची टाकी, ऑफीस काम, शौचालय, मुतारी, शाळेला रंगरंगोटी, वृक्षारोपण, क्रीडांगण, इ. गोष्टी करणे गरजेच्या आहेत असे शाळेच्या मुख्याध्यापकांनी ग्रामस्थांना सांगितले. शाळेसाठी लागणाऱ्या सर्व गोष्टी लोकवर्गणीतून करण्याचे ठरविले. त्याचप्रमाणे काम करण्यासाठी लोक कामाला लागले. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक स्वच्छतेकडे अधिक लक्ष दिले होते. तसेच गावातील दत्तमंदिर मोडकळीस आले होते. त्या मंदिराचा जीर्णोद्धार करण्याचे ठरविले. याबरोबर ग्रामपंचायत इमारतीचे बांधकामही नव्याने करण्याचे ठरविले. शाळेसाठी लागणाऱ्या सर्व गोष्टी, मंदीराचे नवीन बांधकाम, पंचायतीचे नवीन बांधकाम लोकवर्गणीतून करायचे ग्रामस्थांनी ठरविले.

अभियानानंतर मात्र खूप नवे बदल दिसून आले. ४ थी नंतर मुलांना बाहेर गावी जावे लागते म्हणून ५ वी ते ७ वी पर्यंतची शाळा गावात सुरू केली आहे. जैन्याळ गावची

शाळा फक्त अभियानामुळे बालउद्यानासारखी झाली आहे. शाळेला रंग दिलेला आहे. मुलांना बसण्यासाठी आता बेंच आहेत. शाळेतील मुलेही शिस्तप्रिय आहेत. प्राथमिक शाळेमध्ये दोन शौचालये आहेत. मुलांच्याकरिता ६ मुताऱ्या व मुलींकरिता ६ मुताऱ्या अशी स्वतंत्र व्यवस्था आहे. सदरचे सर्व बांधकाम लोकवर्गणीतून केले आहे. सदरचे सर्व शौचालयाची स्वच्छता दररोज विद्यार्थ्यांमार्फत केली जाते. अंगणवाडीकरिता स्वतंत्र शौचालय असून सदर बांधकाम लोकवर्गणीतून केले आहे. ग्रामपंचायत कार्यालयाचे स्वतंत्र शौचालय आहे. याबरोबर बस थांब्याजवळ स्वतंत्र शौचालयाची व्यवस्था केली आहे. गावामध्ये एकूण तीन ठिकाणी मानवी विष्ठेवर गॅसनिर्मिती केली आहे.

शाळेभोवती बदाम, अशोक, नारळ, वेगवेगळ्या फुलांची अशी अनेक प्रकारची झाडे लावली आहेत. यासोबत दुरांडा ही छान फुलवला आहे. आता मुलांना खेळण्यासाठी क्रीडांगण आहे. मुलांच्या गळतीचे प्रमाण पूर्णपणे कमी झाले आहे. सन २००५-०६ पासून शाळेत 'स्वच्छतादुत' उपक्रम सुरू केला असल्यामुळे शाळेतील मुलांना वैयक्तिक स्वच्छतेपासून ते शाळेच्या स्वच्छतेपर्यंतच्या सवयी लागल्या आहेत. मुलांची स्वच्छतेविषयीची जाणीव-जागृती वाढली आहे. प्रत्येक सोमवारी शाळेमध्ये मुलांच्या वैयक्तिक स्वच्छतेबाबत नखे काढणे, दातांची निगा राखणे, अंघोळ करणे, केस कापणे, गणवेश स्वच्छता इ. बाबत सर्व शिक्षक तपासणी करतात व याबाबत काही उणिवा असल्यास विद्यार्थी व पालकांना सूचना देतात.

नव्या ग्रामपंचायतीची नवी आकर्षक इमारत उभी राहिली आहे. ग्रामपंचायत इमारतीत आता स्वतंत्र सभागृह आहे. ग्रामपंचायतीत ग्रामसेवकांसाठी स्वतंत्र खोली आहे, सरपंच व उपसरपंच यांच्यासाठी स्वतंत्र खोली आहे. ग्रामपंचायतीसाठी स्वतंत्र शौचालय व न्हाणीघराची व्यवस्था उपलब्ध आहे. गावाची पाहणी करण्यासाठी आलेल्या (अधिकारी) पाहुण्यांना स्वतंत्र राहण्याची खोली इ. चे बांधकाम केले आहे. ग्रामपंचायतीसमोर दुरांडा, बदाम, शिलवर ओक, उलटा अशोक अशी अनेक झाडे लावून

छान बाग तयार केली आहे. या बागेमुळे ग्रामपंचायतीचे सौंदर्य वाढलेले आहे.

गावातील काही देवालयांचे नवीन बांधकाम केले. देवालयांना रंग दिलेला आहे. मंदिराच्या सभोवतालचा परिसर सुद्धा स्वच्छ केलेला आहे. ग्रामपंचायतीसमोर गावातील सार्वजनिक कार्यक्रमांसाठी सार्वजनिक व्यासपीठ बांधलेले आहे. या व्यासपीठावर ग्रामसभा, सार्वजनिक गणपती उत्सव (एक गाव एक गणपती) घेतला जातो. शाळेतील मुलांचे आरोग्य वेळोवेळी तपासले जात असल्याचे दिसून आले.

गावात स्वतंत्र स्मशानभूमी असून इतर गावापेक्षा एक वेगळेपणा आहे. सदर ठिकाणी स्मृतीवन तयार करण्यात आलेले असून प्रत्येक मयत व्यक्तीच्या नावे तेथे एक वृक्ष लावून त्याची जोपासना संबंधितांचे नातेवाईक उत्तम प्रकारे करतात. त्या स्मशानभूमीस 'विश्रांती' हे नाव दिले आहे.

**५) दि. ९ व १० ऑक्टोंबर ०३ (शनि. व रवि.) 'घर व परिसर स्वच्छता व सजावट मोहिम'**

अभियानाच्या अंमलबजावणीपूर्वी जैन्याळ गावामध्ये ३५ अतिक्रमणे होती. घरांभोवती घाणीचे जंगल होते. गटारे नसल्यामुळे सांडपाणी रस्त्यावर साठत होते. ज्यांच्या घरात तरुण मुली असतील त्यांचीच घरे थोडीफार स्वच्छ होती. इतर महिलांना मात्र शेतीच्या कामाबरोबर घर स्वच्छता करायला वेळ मिळत नव्हता. पिण्याचे पाणी व स्वयंपाक खोली कमी प्रमाणात स्वच्छ होती. दिवाळी, दसरा, गणपतींसारखे सण बघूनच घराची स्वच्छता व रंगरंगोटी केली जात असे. इतर वेळी चुलीच्या धुराने घर खूपच अस्वच्छ दिसायचे.

अभियानकाळात दि. ९ व १० ऑक्टोबर ०३ या दोन दिवसात घर व घराभोवतीचा परिसर स्वच्छ करावयाचे प्रत्येकाने ठरविले. प्रत्येक कुटुंबाने आपापल्या घराभोवतीची अतिक्रमणे हटविली. महिला व पुरूष या सर्वांच्या सहभागातून स्वच्छता मोहिम सुरू

केली. गावातील रस्ते, गल्ल्या, घरासमोरील अंगणे, परसदारे नीटनेटकी व सुंदर केली. अंगणात सडा शिंपून रांगोळी काढण्यात आली. घर व परिसर स्वच्छता स्पर्धा ठेवण्यात आली असल्यामुळे गावातील पदाधिकारी यांच्यामार्फत घर परिसर स्वच्छता व सजावट कार्यक्रमांचे स्पर्धेनुसार नंबर काढण्यात आले. गावातील लोकांनी आपापली घरे स्वत: रंगविण्याचे ठरविले. घरातील स्वयंपाक घराची व्यवस्था, सांडपाण्याची विल्हेवाट, वैयक्तिक शौचालय व्यवस्था, घराभोवती झाडे लावणे इ. अनेक प्रकारची कार्ये कशी करावीत याविषयीचे मार्गदर्शन केले.

तसेच काहीं तरुणांनी एकत्र येऊन संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाचा अर्थ समजावून घेतला. 'स्वत: बदला जग बदलेलं' याचा अर्थ त्यांनी 'स्वत: बदला गाव बदलेल' असा लावून कामाला सुरवात केली. प्रत्येक प्रभागातील तरुण मुलांनी एकत्र येऊन तरुण मंडळे स्थापन केली होती. आपापल्या प्रभागाची मिटींग घेऊन लोकांच्या मनामध्ये स्वच्छतेचा अर्थ त्यांनी पटवून दिला. ज्या लोकांनी आपल्या दारासमोरील गटारीतील घाण काढली नाही तेथे मंडळातील सदस्यांनी स्वत:घाण काढून गटारी साफ केल्या. काही लोकांकडून त्यांचा अपमान झाला तरीही प्रयत्न चालू ठेवले. याचा हळूहळू लोकांवर परिणाम झाला. यामुळे लोक कामात सहभागी होऊ लागले. गावातील तरुण मुलीही या कामात मागे राहिल्या नाहीत. युवती मंडळाची स्थापना करून त्यांनी कामाला चालना दिली. घरातील स्वच्छतेवर देखरेख करणे, महिला बचत गटांना मार्गदर्शन करणे, महिलांच्या कामांचे नियोजन करणे अशा अनेक गोष्टींची जबाबदारी त्यांनी स्वत:हून उचलली होती. तसेच या युवतींनी वैयक्तिक स्वच्छता, पिण्याच्या पाण्याचा वापर, खाद्य पदार्थ हाताळणे, घराची मांडणी, घर व परिसर स्वच्छता याबाबत प्रबोधन, शौचालयाचे महत्त्व ही पटवून दिले.

क्षेत्रीय निरीक्षणात दिसून आले की, गावातील सर्व घरे मालकी हक्काने महिलांच्या नावावर करण्यात आली आहेत. २८६ कुटुंबामधील गृहिणींची नावे एकाचवेळी सातबाराच्या

उताऱ्यावर उतरली गेली. प्रत्येक कुटुंबांच्या संपत्तीची मालकीण ही महिला झाली. खऱ्या अर्थाने महिला या घराच्या मालकीणी बनल्या, गृहस्वामिनी झाल्या. महाराष्ट्रातील पहिला मान जैन्याळ गावातील महिलांनी कुटुंबप्रमुख म्हणून मिळविला आहे. ३ जानेवारी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा जन्म दिवस यादिवशी अण्णासाहेब नवणे यांच्या हस्ते १०,००० रु. चे पारितोषिक व मानपत्र महिलांना दिले. जिल्हा परिषदेने घर पती-पत्नींचे ही योजना आणली, परंतू जैन्याळकरांनी त्याही पुढचे पाऊल उचलून संपूर्ण घर पत्नीच्या मालकीचे केले. तसेच तरुण-तरुणांनी एक नवा आदर्श समाजापूढे ठेवला असून 'यापुढे हुंडा घेणार नाही आणि देणार नाही अशी अग्नीशपथ घेतली. याबरोबर प्रत्येक गल्लीतील सुरवातीस माहिती फलकावर स्त्री-पुरूष, जनावरे, विद्यार्थी, सुशिक्षित बेकार किती याची माहिती आहे. गावातील गल्ल्यांना संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत तुकाराम, संत एकनाथ अशी संतांची नावे देण्यात आली आहेत.

गावातील संपूर्ण घरे एकाच रंगाने रंगविल्यामुळे गावाने त्यातून एकतेचे प्रतिकात्मक रूप दाखविले आहे. घरातील अंतर्गत व्यवस्था ही कमी खर्चात कमी जागेत उत्कृष्टपणे ठेवण्याचा प्रयत्न केल्याचेही दिसून आले. घरात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था ही उंच ठिकाणी ठेऊन त्यावर व्यवस्थित झाकण ठेवले असल्याचे दिसून आले. पाहुण्यांना पाणी हे वगराळानेच दिले जाते. अपारंपारिक ऊर्जा स्त्रोतामध्ये निर्धुर चूल, सिलेंडर गॅस, गोबर गॅस, स्टोव्हचा वापर केला जात असल्याचेही दिसून आले. कपडे धुण्यासाठी सामुदायिक धोबीघाट तयार करण्यात आला आहे. गुरांच्या गोठ्यातील सांडपाणी, घनकचऱ्याची विल्हेवाट संबंधित घरमालक कंपोस्ट खतासाठी करत असल्याचे दिसून आले.

**६) दि. ११ व १२ ऑक्टो. (सोम. व मंगळ) "स्वच्छताविषयक साहित्याचे प्रदर्शन व प्रात्यक्षिके व प्रसार प्रसिध्दी या बाबतच्या तांत्रिक ज्ञानाबाबतची प्रात्यक्षिके"**

जैन्याळ गावाने अभियानाचा मूळ हेतू डोळ्यासमोर ठेवूनच ग्रामस्थांसाठी ग्रामपंचायत कार्यालयाच्या पटांगणात स्वच्छताविषयक साहित्य प्रदर्शनाचा कार्यक्रम

आयोजित केला होता. या प्रदर्शनात आरोग्य कर्मचारी व अधिकारी यांनी मार्गदर्शन केले. शौचालये स्वच्छ ठेवण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या रसायनांची माहिती देवून प्रात्यक्षिक दाखविले. यावेळी स्वच्छतेचे महत्व सांगताना अंघोळीच्या वेळी साबण का महत्वाचा, शौचालयाचा जाऊन आल्यानंतर साबनाने हात का धुवावा याविषयीची माहिती सांगितली. सांडपाण्याचा निचरा होण्यासाठी शोषखड्डे महत्वाचे आहेत. पिण्याचे पाणी झाकून ठेवणे तसेच टी.सी.एल.द्वारा शुध्द केलेले पाणी पिणे आवश्यक आहे, असे सांगितले. या प्रदर्शनामुळे स्वच्छतेविषयीचे महत्व गावांमध्ये घरोघरी पोहचले गेले.

अभियानानंतर आजही ग्रामस्थांना स्वच्छतेविषयक साहित्याचे मार्गदर्शन केल्यामुळे स्वच्छता अधिक दिसते. घरातील प्रत्येक व्यक्ती शौचालयाचा नियमित वापर करते. शौचालये स्वच्छ ठेवली जातात. शौचालयाला जावून आल्यानंतर व जेवणापूर्वी लोक साबणाने हात धुतात. सांडपाण्याची योग्य ती विल्हेवाट लावली जाते. पिण्याचे पाणी शुध्द करण्यासाठी टी.सी.एल. पावडर वापरतात. वैयक्तिक स्वच्छतेमध्ये दररोज अंघोळ करतात व अंघोळीसाठी साबणाचा नियमित वापर करतात.

**७) दि. १३ व १४ ऑक्टोबर २००३ (बुध व गुरु) ''शौचालय दुरुस्ती/बांधकाम अभियान मोहिम''**

जैन्याळ गावात एकूण २८६ कुटूंबे असून अभियानापूर्वी त्यापैकी फक्त १०४ कूटुंबाकडे शौचालये होती. उर्वरीत १८२ कुटूंबे ही शौचालयासाठी उघड्यावर जात होती. त्यामुळे गावात सर्वत्र घाणीचे साम्राज्य होते.

अभियानकाळात दि. १३ व १४ ऑक्टोबर २००३ या दोन दिवसात शौचालय वापर व स्वच्छता कशी राखावी यासाठी उद्‌बोधन वर्ग घेवून प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. गावातील गवंड्यांना कमी रकमेत शौचालय बांधकाम कसे करावे याचे मार्गदर्शन ग्रामपंचायतीने केले. एक गाव एक पाणवठा त्याप्रमाणेच एक घर एक शौचालय याप्रमाणे

प्रत्येकाने शौचालय बांधून घ्यावे असे ग्रामसेवक यांनी सांगितले. या आवाहनाला प्रतिसाद म्हणून ग्रामस्थांनी आपआपली शौचालये स्वखर्चाने बांधण्याचा संकल्प केला. गावात १००% शौचालये पूर्ण होण्याच्या दृष्टीकोनातून १८२ शौचालयाची गरज होती. यापैकी ४१ कुटुंबातील स्वत: शौचालय बांधण्यास तयार झाले. उर्वरित १४१ कुटुंबांची आर्थिक परिस्थिती नाही. त्यामुळे त्यांची शौचालये ही कर्ज काढून बांधण्याचे ठरविले व त्यानुसार कार्यवाही चालू केली. गाव हागणदारीमुक्त करण्याचे धोरण ग्रामस्थांनी अवलंबिले.

अभियानकाळानंतर ४१ कुटुंबांनी स्वखर्चाने शौचालयाचे बांधकाम करून घेतले आहे. १४१ कुटुंबे शौचालयाविना होती. सदर लोकांची शौचालय बांधण्याची इच्छा होती. त्यामुळे ग्रामपंचायतीने जिल्हा ग्रामविकास योजनेतून कर्ज घेऊन गरजू लाभार्थींना ५००० कर्ज देऊन ७४ शौचालये बांधून घेतली. यानंतर स्वच्छता कार्यक्रमातून २० शौचालयांचे काम केले. सदर २० शौचालये सुरूवातीला प्रत्येक युनिटला ४ कुटुंबे याप्रमाणे वाटप केले. पण ते आता एकास दोन प्रमाणे करून उर्वरित ४७ कुटुंबांपैकी ३७ कुटुंबांना ग्रामपंचायतीकडून कर्ज देऊन शौचालय बांधकाम केले आहे. उर्वरित १० कुटुंबांनी बायोगॅस व शौचालय असे बांधकाम केले. असे सर्व २८६ कुटुंबांचे शौचालयाचे बांधकाम करून जैन्याळ गाव हागणदारीमुक्त केला आहे.

आजमितीला संपूर्ण जैन्याळ गाव हागणदारी मुक्त आहे. परिणामी सन २००५ मध्ये केंद्र शासनाचा 'निर्मल ग्राम' हा पुरस्कार गावाला मिळाला व २०,००० रु. चे पारितोषिक व प्रमाणपत्र मिळाले आहे. गावातील सर्व शौचालये वैयक्तिक असल्यामुळे त्यांची निगा संबंधीत घरमालक स्वत: करतात व गावातील १००% शौचालयाचा नियमित वापर करतात, असे चर्चेतून समजले. गावातील प्राथमिक शाळेत दोन शौचालये, मुलांसाठी सहा व मुलींसाठी सहा मुताऱ्या अशी स्वतंत्र व्यवस्था केली आहे. हे सर्व बांधकाम लोकवर्गणीतून केले असल्याचे समजले. तसेच शाळेतील शौचालयांची स्वच्छता दररोज विद्यार्थ्यांमार्फत केली जात आहे. अंगणवाडीकरिता एक स्वतंत्र शौचालय,

ग्रामपंचायतीकरिता एक स्वतंत्र शौचालय व बसथांब्याजवळ एक स्वतंत्र शौचालय अशी व्यवस्था केली आहे. गावात एकूण तीन ठिकाणी मानवी विष्ठेवर गॅस निर्मिती केली आहे. उघड्यावर शौचास बसणाऱ्या व्यक्तीस १०० रु. दंड आणि उघड्यावर शौचास बसणारी व्यक्ती दाखवून देणाऱ्या व्यक्तीस ५० रु. बक्षिस जाहीर केले आहे.

### ८) दि. १५ व १६ ऑक्टोबर ०३ (शुक्र. व शनि.) 'पाणी शुद्धता प्रात्यक्षिक व प्रशिक्षण मोहिम'

पूर्वी जैन्याळ गावाला प्रचंड प्रमाणात पाणी टंचाई भासत होती. संपूर्ण गावासाठी एकच विहिर असल्यामुळे विशेषत: उन्हाळ्यात पाण्याची खूप टंचाई भासत होती. त्यामुळे गावाबाहेरून ट्रॅक्टरने गावाला पाणी पुरवठा केला जात असे.

अभियानांतर्गत उपक्रम म्हणून प्रथमत: पिण्याच्या पाण्याच्या विहिरींची स्वच्छता करण्यात आली. नंतर टी.सी.एल. पावडर टाकून शुद्ध केलेल्या पाण्याची तपासणी व प्रात्यक्षिक ओ.टी. सोल्युशन वापरून दाखविले. गावच्या नळ पाणीपुरवठा योजनेची किरकोळ दुरूस्ती करून घेतली. पिण्याचे पाणी एकाच ठिकाणी असल्यामुळे पाण्याचा वापर काटकसरीने करावा तसेच उन्हाळ्यात रेशनिंग पद्धतीने पाणी देण्याचे आवाहन केले.

जैन्याळ गावामध्ये पिण्याच्या पाण्यासाठी संपूर्ण गावाने लोकवर्गणीतून ४५० फूट बोअर मारून त्यावर ५ एच.पी. क्षमतेचा सबमर्सीबल पंप बसवून घेतला आहे. एक टँकरग्रस्त गाव आज टँकरमुक्त झाले आहे. विंधन विहिरीवरून पाणी उपसा करून ३३,५०० लि. ची गावातील पाण्याची टाकी, संताजी नगरातील ३,००० लि. ची टाकी, श्रमनगरातील ३,००० लि. ची टाकी सकाळ व संध्याकाळ अशी दिवसातून दोन वेळा भरली जाते. पाण्याच्या टाकीजवळ शेंड वनस्पतीने साम्राज्य केले होते. अभियानकाळात या वनस्पतीचे संपूर्ण निर्मूलन करून पाण्याच्या टाकीच्या सभोवतालचा परिसर सुशोभित व हवेशीर केला आहे. पिण्याच्या पाण्याची रासायनिक तपासणी करून घेतली. या स्त्रोतातील पाणी पिण्यास

योग्य असल्याचे दिसून आले. अभियानकाळात सार्वजनिक नळांना तोट्या व काही पाईपा नव्हत्या त्या संपूर्ण चालू करून घेतल्या. पाणी एकाच ठिकाणी असल्याने पाण्याचा वापर आज काटकसरीने होत असल्याचे दिसून आले. मात्र उन्हाळ्यात रेशनिंगपद्धतीने पाणी दिले जाते. दररोज टी.सी.एल. पावडर टाकून पाणी निर्जंतुकी करूनच पिण्यासाठी वापरले जात आहे.

कपडे धुण्यासाठी स्वतंत्र धोबी घाट बांधण्यात आला आहे. तसेच शिवकालीन पाणी साठवण योजनेअंतर्गत १०,००० लि. क्षमतेच्या टाकीचे बांधकाम केले असून पावसाळ्यात अंगणवाडी इमारतीचे संपूर्ण पाणी त्या टाकीत एकत्र केले आहे. या पाण्याचा वापर विशेष करून उन्हाळ्यात घरगुती वापरासाठी केला जातो. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे घरातील पाणी हाताळण्याबाबत घरोघरी जाऊन महिला कार्यकर्त्यांनी लोकांचे प्रबोधन केल्यामुळे आजही प्रत्येक घरात पिण्याचे पाणी स्वतंत्र व उंच ठिकाणी ठेऊन त्यामध्ये हात न बुडवता वगराळानेच पाणी दिले जात आहे. तसेच वापराचे पाणी स्वतंत्र बंदिस्त ठेवले आहे. एकंदरीत गावात पाण्याचा अपव्यय टाळला असल्याचे दिसून आले. संपूर्ण गाव स्वच्छ पाणी वापरत असल्यामुळे गावात पाण्यापासून होणाऱ्या रोगांचे प्रमाण नाहीसे झाले आहे. पाणी पट्टीचा दर प्रत्येक कुटुंबाला १००/- प्रमाणे असून तो प्रत्येक वर्षी १ एप्रिल या दिवशीच वसूल केला जात असल्याचे समजले.

**९) दि. १७ व १८ आक्टो. ०३ (रवि. व सोम.) वैयक्तिक स्वच्छता जागृती (नखे काढणे, स्वच्छ अंघोळ करणे, केस धुणे, उवा निर्मुलन) मोहिम'**

'निरोगी शरीरात निरोगी मन वास करते' म्हणून वैयक्तिक आरोग्य हीच आपली दौलत. स्वच्छतेचे हे महत्त्व जाणून लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत सर्वांनाच आपले आरोग्य व्यवस्थित ठेवणे महत्त्वाचे आहे. दि. १८ ऑक्टों. रोजी प्राथमिक शाळेत मुलांची नखे काढण्याचा उपक्रम घेण्यात आला. डोक्यावरील केसातील अस्वच्छतेमुळे जटा धरतात आणि जटाधारी मुलींचे सौंदर्य लोप पावते. यामुळे मुलींचे जीवन निराशामय होते. याचे

महत्त्व शाळेतील मुलींना पटवून देण्यात आले होते. अस्वच्छतेमुळे आरोग्य बिघडते. खरूज, नायटा इ. सारखे रोग होतात ते होऊ नयेत यासाठी वैयक्तिक आरोग्य स्वच्छ ठेवावे. दररोज अंघोळ करावी, वेळीच नखे कापावीत. याबाबतचे मार्गदर्शन आरोग्य सेविका यांनी केले. निरोगी जीवनासाठी स्वच्छतामय जीवन जगण्याचा निर्धार करण्यात आला.

व्यक्तिगत आरोग्यसंदर्भातील प्रबोधनामुळे आता जैन्याळ गावात महिला, मुले, वृद्ध, या सर्वांच्या वैयक्तिक स्वच्छतेकडे अधिक लक्ष दिले जात असल्याचे दिसून आले. प्रत्येक सोमवारी प्राथमिक शाळेत मुलांच्या वैयक्तिक स्वच्छतेबाबत नखे काढणे, दातांची निगा राखणे, अंघाळे करणे, केस कापणे, कपड्यांची स्वच्छता इ. बाबत सर्व शिक्षक तपासणी करतात. याबाबत काही उणिवा असल्यास विद्यार्थी व पालकांना शिक्षक काही सूचना देतात.

गावात ग्रामपंचायतीच्या स्थापनेपासून ते आजतागायत कोणताही साथीचा रोग नाही. गावात दोन वेळा भव्य रक्तदान शिबीर घेण्यात आले होते. यामध्ये तरुणांचा व महिलांचा सहभाग चांगला होता. रक्तदानामध्ये २१ महिला व ४६ पुरूषांनी रक्तदान केले आहे. सदरचे रक्तदान हे शासकीय रक्तपेढी येथे केले आहे. तसेच गावातील संपूर्ण व्यक्तींची रक्तगट चाचणी झालेली आहे. याबरोबर संपूर्ण कुटुंबांना कुटुंब संजिवनी कार्ड देण्यात आले आहे. गावात सामाजिक शांतता, सुरक्षितता राखण्यासाठी नशाबंदी, व्यसनमुक्ती व कुटुंब नियोजन मोहिम घेण्यात आली आहे.

**१०) दि. १९ व २० ऑक्टो. ०३ (मंगळ व बुध) 'रस्ते दुरूस्ती, सफाई व श्रमदान मोहिम'**

अभियानापूर्वी जैन्याळ गावातील रस्ते नादुरूस्त होते. पावसाळ्यात पायात चप्पल घालता येत नव्हते इतका चिखल रस्त्यावर होत होता. रस्त्यावर अनेक ठिकाणी डबकी

होती. ती डबकी नेहमीच पाण्याने भरलेली असायची. घरातील सांडपाणी रस्त्यावरून वहात होते, कारण रस्त्याच्या कडेला घाणीने तुडूंब भरलेली गटारे होती. गावात डासांचे साम्राज्य होते. तसेच रस्त्याच्या दुतर्फा रानवेली, झुडपे वाढलेली होती.

दि. १९ व २० ऑक्टो. या दोन दिवसात ग्रामस्थांनी गावातील रस्ते श्रमदानाद्वारे स्वच्छ करण्यास सुरवात केली. दि. २० ऑक्टों. या दिवशी एकूण २ कि. मी. रस्त्यांचे काम करण्याचे ठरविले. यामध्ये एस.टी. स्टँड ते ग्रामपंचायत ऑफीस, मागासवस्ती ते ओढ्यापर्यंत, महादेवनगर मधील दोन गल्ल्यांचे खडीकरण करण्याचे ठरवून कामाला सुरवात केली. रस्त्याच्या दुतर्फा वाढलेल्या रानवेली, झुडपे, घाणेरी काढून रस्ते स्वच्छ केले. याबरोबरच गावातील रस्त्यातील खाचखळगे, बाजूपट्ट्या मुरूम टाकून दुरूस्त केले. श्रमदानामुळे गावातील रस्ते दुरूस्त झाले तसेच ते स्वच्छ झाले. रस्ते दुरूस्तीच्या कामात तरुण मंडळांचा सहभाग मोठ्या प्रमाणात होता. तसेच जेथून चालता येत नव्हते त्या संपूर्ण पाणंदी खुल्या करून तेथे रस्ते तयार केले. गावामध्ये येण्यासाठी येणाऱ्या रिंगरोडवर दोन्ही बाजूला गाजरगवत होते व तेथेच लोक शौचास बसत होते. त्यामुळे तेथून येताना फक्त पायवाट व दुर्गंधी वाटत असणारा रस्ता खुला करून ग्रामस्थांनी त्यावर वृक्षारोपण केले.

गावाला दिलेल्या भेटीच्यावेळी गावातील संपूर्ण रस्त्यांचे डांबरीकरण केले असल्याचे दिसून आले. नामदार हसनमुश्रीफ यांच्या फंडातून व लोकवर्गणीतून ८ लाखाचे डांबरीकरण करून जैन्याळ गाव सुंदर व स्वच्छ करण्यात भर घातली आहे. रस्त्याच्या कडेची हिरवळ, स्वच्छ रस्ता, स्वच्छ गटारे पाहून मन प्रसन्न होते.

अभियानापूर्वी एकही कचराकुंडी नव्हती. आता प्रत्येक गल्लीत याप्रमाणे कचराकुंडी ठेवली आहे. तसेच प्रमुख चौकात ओला व सुका कचरा, काच, प्लॅस्टिक, धातु इ. साठी दोन स्वतंत्र ठिकाणी कचरा कुंड्या बांधण्यात आल्या आहेत. प्रत्येक गल्लीत दररोज निघणारा कचरा प्रत्येक प्रभागातील मंडळाची मुले यांच्या घंटागाडीतून वर्गवारी करतात. सदरचा कचरा हा नॅडेप प्रकल्पात टाकून त्यापासून शास्त्रीय पद्धतीचे खत तयार

करतात. ओल्या खतापासून गांडूळ खत प्रकल्प तयार केला असून त्यापासून ग्रामपंचायतीला आर्थिक उत्पन्न मिळत असते. पण सध्या हा प्रकल्प बंद असल्याचे समजले. गावात प्लॅस्टिक वापरावर बंदी असून अंमलबजावणी काटेकोरपणे केली जाते.

**११) दि. २१ व २२ ऑक्टो. ०३ (गुरू व शुक्र) "जनावरे स्वच्छता मोहिम, आदर्श गोठा व स्वच्छ जनावर स्पर्धा"**

जैन्याळ गावात शेती हा मुख्य व्यवसाय आहे. गावातील अनेक कुटुंबे जोड व्यवसाय म्हणून पशूपालन हा व्यवसाय करतात. शेतीच्या कामासाठी आवश्यक अशी बैल, रेडे यासारखी जनावरे तसेच दुधासाठी गाय, म्हैस, शेळ्या अशी जनावरे अनेक कुटुंबाकडे आहेत. पण पाळीव जनावरांच्या स्वच्छतेकडे जाणीवपूर्वक फारसे लक्ष दिले जात नव्हते.

अभियानकाळातील कार्यक्रम म्हणून जनावरांची काळजी शेतकऱ्याने घेतली पाहिजे. हे वरील दोन दिवसात गावकऱ्यांच्या लक्षात आणून दिले. जनावरांना साथीचे रोग होऊ नयेत यासाठी पशुसंवर्धन विभागामार्फत जनावरांचे आरोग्य शिबीर या दोन दिवसात घेतले. पशूवैद्यकीय अधिकारी यांनी लसीकरण, जनावरांना आजार होऊ नये यासाठी घ्यावी लागणारी काळजी, जनावरांची निगा कशी राखावी, विशेष जनावरांचे गोठे कसे स्वच्छ ठेवावेत, त्यांच्या मलमुत्राची विल्हेवाट कशी लावावी, गोठे निर्जंतुक कसे करावेत याविषयीचे ग्रामस्थांना मार्गदर्शन केले. यावेळी जनावरे स्वच्छता प्रात्यक्षिक देखील दाखविण्यात आले. दि. २१ ऑक्टो. पासून सर्व गावकऱ्यांनी जनावरांची जाणीवपूर्वक योग्य ती देखभाल करून गोठे स्वच्छ ठेवण्याचे ठरविले. तसेच स्वच्छ गोठा व स्वच्छ जनावरे स्पर्धा घेतल्या.

गावाला दिलेल्या भेटीच्या वेळी लोकांनी सांगितले की, आता जनावरांना वेळोवेळी धुतले जाते. गोठा स्वच्छ ठेवला जातो. जनावरांच्या मलमुत्राची कंपोस्ट खतासाठी योग्य

ती विल्हेवाट लावली जाते. तसेच जनावरांना कोणतेही रोग होऊ नयेत म्हणून लसीकरण केले जात आहे. दुभत्या जनावरांना कोणते खाद्य कोणत्या वेळी द्यावे. जनावर गाभण असताना कोणती काळजी घ्यावी याविषयीचे मार्गदर्शन केल्यामुळे जनावरांची योग्य ती काळजी ग्रामस्थ घेतात असेही उत्तरदात्यांनी सांगितले.

**१२) दि. २३ व २४ ऑक्टों ०३ (शनि. व रवि.) 'वृक्षसंवर्धन, परसबागा, अपारंपारिक ऊर्जा संरक्षण मोहिम'**

जैन्याळ गावात अभियान राबविण्यापूर्वी परसबागा वगैरे नव्हत्या पण ठराविक वृक्षांचे वृक्षसंवर्धन होत होते. पर्यावरणाचे इतकेही महत्त्व नसल्यामुळे वृक्षतोड प्रचंड प्रमाणात होत होती. त्यावेळी वृक्षसंवर्धन इतके काळजीपूर्वक केले जात नव्हते.

अभियानकाळात आपल्या घराचे सांडपाणी इतरत्र न सोडता त्या सांडपाण्याचा वापर झाडांना करावा यासाठी प्रत्येकाने आपल्या घराभोवती परसबाग तयार करावी असे अभियान कमिटीने ग्रामस्थांना सांगितले. यामध्ये सांडपाण्यावर केळी, बदाम, चिक्कू, आंबा, भाजीपाला, कडीपत्ता, वेगवेगळ्या फुलांची झाडे इ. झाडे येऊ शकतात, असे त्यांनी सांगितले. अपारंपारिक ऊर्जा स्त्रोतामध्ये निर्धुर चुल (समाधान चुल) वापरायची असे ठरविले.

परसबागांप्रमाणेच पर्यावरण संरक्षणासाठी वृक्षारोपणाचे महत्त्व गावकऱ्यांना पटवून दिले. त्यामुळे ग्रामस्थांनी वृक्षारोपणावरही भर दिला. गावात एकूण ३१,१६८ इतके वृक्षारोपण श्रमदानातून केले आहे, असे गावाच्या अहवालात नमूद केले आहे. रस्त्याच्या दुतर्फा, दुरांडा केळी, बदाम, चिक्कू, आंबा, नारळ, भाजीपाला, उलटा अशोक अशी अनेक प्रकारची झाडे आजही जिवंत आहेत. गावातील वृक्षारोपणामध्ये प्रत्येक विद्यार्थ्याला एक झाड दत्तक देऊन ते जगवून घेतलेले आहे. प्रत्येक घराजवळ परसबाग आजही दिसते. प्रत्येक घराच्या दारात तुळसकट्टा आहे. तसेच गावातील सांडपाण्यावर औषधी वनस्पतींची

लागवड केली आहे. तसेच चौकाला लागूनच 'ऑक्सीजन पार्क' केला आहे. या पार्कमध्ये औषधी गुणधर्माच्या तुळशीची विविध प्रकारची रोपे लावली आहेत. या ऑक्सीजन पार्कमुळे शंभर मीटरपर्यंतचे वातावरण शुद्ध राहत असल्याचे सांगण्यात आले. तसेच पार्कभोवती बैठक व्यवस्था केली आहे. ऑक्सीजन पार्कमध्ये शंकराची मूर्ती बसविली आहे. सदर कट्ट्यावर रोज सायंकाळी वयस्कर लोक बसतात व त्यामुळे त्यांच्या प्रकृतीवर त्याचा चांगला परिणाम झाल्याचे गावकरी सांगतात. वृक्षारोपणामुळे व परसबागांमुळे गावातील पर्यावरण स्वच्छ व आरोग्यदायी असल्याचे दिसून आले.

अपारंपारिक ऊर्जेचा वापर करून गावातील संपूर्ण स्ट्रीट लाईट बंद करणारे महाराष्ट्रातले जैन्याळ हे पहिले गाव आहे. या ग्रामस्थांची कामावरील प्रामाणिक निष्ठा पाहून छ. शाहू साखर कारखान्याचे संस्थापक राजे विक्रमसिंह घाटगे यांनी कारखान्यामार्फत देणगी स्वरूपात सौर ऊर्जेचे ५० हजार रु. किंमतीचे दिवे गावासाठी दिले आहेत. त्यामुळे गावात लाईट असो अगर नसो सौरऊर्जेचे दिवे संध्याकाळी लागतात. तसेच संशोधिकेच्या निरीक्षणावरून असे दिसून आले की, आजही निर्धुर चुलीचा वापर असल्याचे दिसून आले. गावात निर्धुर चुली २२५, बायोगॅस ७१, सोलर कुकर ४, सौरकंदिल १३ असे स्त्रोत आहेत. सर्व गावकऱ्यांना एकत्र कामाला बोलविण्यासाठी, कार्यक्रमासाठी, सभेसाठी २०-०४-२००४ रोजी कार्यरत असलेली 'संस्कार वाहिनी' चा वापर नेहमी करत असल्याचे समजले. पहाटे पहाटे अभंगाचे सूर गावकऱ्यांच्या कानावर पडतात व कामाचा वेगळाच आनंद त्यांना मिळतो.

### १३) दि. २५ व २६ ऑक्टों ०३ (सोम व मंगळ) 'गावात स्लोगन (घोषवाक्य) स्पर्धा, निबंध स्पर्धा, व्यसनमुक्ती मोहिम'

चार ते पाच वर्षापूर्वी जैन्याळ गाव हे अट्टल व्यसनाधीन आणि संवेदनशील गाव म्हणून ओळखले जायचे. गावात यात्रा असेल तर पोलिस बंदोबस्ताशिवाय यात्रा व्हायची नाही. किरकोळ कारणावरून भांडण तंटे, संघर्ष नेहमीचेच असायचे. गाव इतकं व्यसनाधीन

होतं की, ग्रामपंचायत कार्यालयात देखील भरपूर दारूच्या बाटल्या सापडायच्या असे उत्तरदात्यंकडून समजले.

अभियानकाळात गाव प्रथमत: व्यसनमुक्त करायचे ठरविले. गावातील काही तरुणांनी एकत्र येऊन व्यसनमुक्ती कमिटी तयार केली. व्यसनमुक्ती कमिटीचे प्रमुख म्हणून विष्णुपंत इंगवले यांची निवड केली. तसेच कमिटीतील प्रत्येक सदस्यांनी व्यसनमुक्त राहण्याची अग्नीशपथ घेतली. तरुणांनी गावातील व्यसनी लोकांना भेटून व्यसनाचे तोटे समजावून सांगितले. कष्टाने जैन्याळ व गाव व्यसनमुक्त करायचे ठरविले. महिला मंडळातील महिलांनी यामध्ये अधिक प्रयत्न केले. ज्यांचा नवरा दारू पितो त्या स्त्रियांनी नवऱ्याला घरातून बाहेर काढले होते. तसेच गावात असलेले दारूचे अड्डे महिलांनी त्याच दिवशी उध्वस्त करून टाकले. जे-जे लोक दारू पिऊन घरात भांडणे करतात त्यांना महिलांनी एकत्र आणले आणि त्यांना दारूचे व्यसन सोडण्याचे आवाहन केले. या दिवशी प्राथमिक शाळेत संत गाडगेबाबांच्या जीवनकार्यावर आधारित निबंध स्पर्धा ठेवण्यात आली. स्वच्छतेचे महत्त्व कळण्यासाठी व ते अंत:करणात रुजविण्यासाठी सुविचार व घोषवाक्ये प्रभावी ठरतात. म्हणून ग्राम स्वच्छता अभियानावर आधारित असलेली एक घोषवाक्य स्पर्धा घेण्यात आली.

या स्पर्धेतील विजयी स्पर्धकांना गावपातळीवर बक्षिस देऊन गौरविण्यात आले. निवडक घोषवाक्ये गावातील प्रत्येक घरावर लिहिण्याचे ठरविले.

गावाच्या प्रवेश द्वाराजवळच 'सावधान गाव व्यसनमुक्त आहे' असा फलक लावला आहे. दारूच्या व्यसनात भडकलेले अनेक लोक आज व्यसनमुक्त आहेत. पूर्वी व्यसनी होते पण अभियान काळात व्यसनमुक्त झालेले आहे. गावात एकूण १७१ माळकरी आजही व्यसनमुक्त आहेत. काही लोकांनी मात्र अभियानकाळापुरतीच दारू सोडली होती. काहीजण कधीकधी बाहेर जाऊन दारू पितात असे अनौपचारिक बोलण्यातून समजले. आजही घराच्या भिंतीवर घोषवाक्ये लिहिलेली आहेत. गुटखा सेवन, विक्री

यावर संपूर्ण बंदी आलेली आहे.

**१४) दि. २७ व २८ ऑक्टो. ०३ (बुध. व गुरू.) 'सदृढ बालक स्पर्धा, माता बालसंगोपन, रोग निदान व साथी रोग प्रतिबंध मोहिम'**

पूर्वी लहान मुलांच्या आरोग्याकडे व त्यांच्या मातांकडे काळजीपूर्वक तितकेसे लक्ष दिले जात नव्हते. गावात उघड्यावरती सांडपाण्यामुळे व गावातल्या घाणीच्या साम्राज्यामुळे रोग होत होते असे उतरदात्यांनी सांगितले. स्वच्छता आणि आरोग्य एकमेकांशी संबंधित आहेत याचे महत्त्व ग्रामस्थांना खूप कमी प्रमाणात समजत होते असेही त्यांनी सांगितले.

अभियानकाळात मात्र संपूर्ण गावातील लोकांची आरोग्य तपासणी घेण्यात आली. यावेळी गावच्या ग्रामसेवकांनी व वैद्यकीय अधिकाऱ्यांनी स्वच्छता व आरोग्य या विषयावर मार्गदर्शन केले. याबरोबर लहान बालकांची व त्यांच्या मातांची तपासणी करून घेतली. सदृढ बालक स्पर्धा व माता बालसंगोपन स्पर्धाही घेतल्या. गावातील ग्रामस्थांना कोणते रोग झाले आहेत का? याचे रोगनिदान केले. सदृढ बालकांसाठी माता सुरक्षित असणे हे ही तितकेच महत्त्वाचे आहे. मुलांचे आरोग्य, मानसिक व शारिरीक वाढ, त्यांचा आहार समतोल राखणे हे मातेवर अवलंबून असते. म्हणून अभियानाच्या निमित्ताने गावातील बालकांची तपासणी व बालकांच्या मातांची तपासणी शिबीर या दोन दिवसात घेण्यात आले होते. तसेच बालक व त्यांच्या मातांना आरोग्यविषयी मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी बालकांना पोलिओ, ट्रिपल, बी.जी.सी. लसीकरण करण्यात आले होते. गावातील संपूर्ण व्यक्तींची रक्तगट चाचणी केली.

**१५) दि. २९ व ३० ऑक्टो. ०३ (शुक्र. व शनि.) 'गटारे, सांडपाणी निर्मुलन, सांडपाणी पुर्नःवापर मोहिम'**

पूर्वी गटारे लहान असल्यामुळे गटारातील सांडपाणी उघड्यावर, रस्त्यावरून वाहत

होते. रस्त्यावर नेहमी पाण्याची दलदल होती यामुळे सर्वत्र डासांचे साम्राज्य होते. जी घरे गटाराला जोडली नाहीत अशा कुटुंबाच्या घरातील सांडपाणी घराभोवतीच साठून राहत होते. त्यामुळे शोषखड्डे, गटारींची दुरूस्ती व बांधकाम, गप्पी मासे पैदास केंद्र इ. कामे करण्याचे अभियानकाळात ठरविले.

हे कार्यक्रम राबविल्यामुळे आज रस्त्यावर कोठेही सांडपाणी वाहत असलेले व साठलेले दिसत नाही. कारण अभियान काळात ठरल्याप्रमाणे ग्रामस्थांनी लोकवर्गणीतून गटारीचे बांधकाम केले आहे. अभियानापूर्वी गावात २६० मी. इतकी गटर होती. आता मात्र २१०० मी. इतकी गटर्स बांधून ती बंदिस्त म्हणजे भूमिगत केली आहेत. गावात गप्पी मासे पैदास केंद्र केले असून सदर पैदास केंद्रातून गावाबाहेर ज्या ठिकाणी सांडपाणी साठविले आहे, अशा ठिकाणी गप्पी मासे सोडून डासांना पळवून लावले.

तसेच सांडपाण्यावर १४६ परसबागा आजतागायत फुलल्या आहेत. एवढेच काय ४२ शोषखड्डेही आहेत. त्यामुळे सांडपाण्याचे व्यवस्थितरित्या निर्मुलन केले असल्याचे दिसून आले. गावातील सांडपाण्यावर गावाबाहेर धोबीघाटाजवळ औषधी वनस्पतींची बाग तयार केली आहे. तसेच काही गावकऱ्यांनी या सांडपाण्यावर शेतीचे उत्पादनही घेतले आहे. व ते वार्षिक ५०० रु. प्रमाणे ग्रामपंचायतीला आकारणी भरतात. या सांडपाण्यावर चिकू, केळी, आंबा, नारळ, फुलांची झाडे, बदाम अशी अनेक प्रकारची झाडे आजही दिसत आहेत.

## १६) दि. ३१ ऑक्टों. ०३ (रविवार) 'संकल्प दिवस'

संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाच्या सर्वात शेवटचा दिवस हा संकल्प दिवस म्हणून साजरा करण्यात आला. या दिवशी संपूर्ण गाव एकत्र झाला. गावातील भांडण, तंटे, संघर्ष, मारामाऱ्या या बाबी पूर्णपणे थांबल्या होत्या. एक महिना आपण गावासाठी राबलो याचाच्र सर्वांना आनंद होत होता. असेच दरवर्षी आपण अभियानात

सहभागी होऊन आपला जैन्याळ गाव स्वच्छतेच्या दारी नेऊन ठेवायचा व राष्ट्राशी एकनिष्ठ राहण्याची ग्रामस्थांनी शपथ घेतली. अभियानात राबविलेल्या सर्व कार्यक्रमांची इथूनपुढे अशीच अंमलबजावणी करू, असे मोठ्या उत्साहाने ग्रामस्थांनी ठरविले. दरवर्षी अभियान राबवून गावातील स्वच्छतेचा वारसा इथून पुढेही टिकवून ठेवण्याचा संकल्प ग्रामस्थांनी केला.

संकल्प केल्याप्रमाणे ग्रामस्थांनी दरवर्षी अभियानात सहभागी होऊन राबविलेल्या कार्यक्रमांसाठी अनेक बक्षिसे व पारितोषिके मिळविली आहेत. ग्रामस्वच्छता अभियानामुळे गावातील अस्वच्छता नाहीशी होऊन गाव खूप छान व सुंदर तयार केलेला आहे. जैन्याळ गाव 'स्वच्छतेकडून समृद्धीकडे वाटचाल करीत आहे, असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

या पार्श्वभूमीवर, पुढील प्रकरणात संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाच्या जैन्याळ गावावर पडलेल्या प्रभावाचे विश्लेषण करण्यात आले आहे.

**संदर्भ :**

२००४ चा जैन्याळ ग्रामपंचायत कार्यालयातून उपलब्ध झालेला संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाच्या अंमलबजावणी संबंधिचा अहवाल.